IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# मानवी हक्क आणि जागतिक लोकशाहीसमोरील आव्हाने – एक अभ्यास

[1]प्रा- डॉ अरुण महादेव राख, [2]श्री रामचंद्र सुरेश आवारी

[1]बाबुजी आव्हाड कॉलेज पाथर्डी, ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर.
[2]संशोधक विद्यार्थी, के. जे. सोमैया कॉलेज कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहिल्यानगर.

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*लोकशाही सरकार, मानवी हक्क, जागतिक मान्यता*

**ABSTRACT**

२१ व्या शतकातील लोकशाही ही शासनाची प्रभावी आणि नैतिकरित्या श्रेयस्कर अशी प्रणाली म्हणून जागतिक मान्यता पावली आहे. लोकशाही आणि मानवी हक्क हे एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. लोकशाहीमध्ये व्यक्तीला केंद्रस्थानी मानले जाते, तर मानवी हक्क त्या व्यक्तीच्या सन्मानाचे रक्षण करतात. दुस-या महायुध्दानंतर १९४८ च्या मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यामूळे यास जागतिक मान्यता मिळाली. आंतरराष्ट्रीय कराराच्या माध्यमातून लोकशाही सरकारच्या संकल्पनेत मानवी हक्कांच्या संरक्षणाची मूलभूत अपेक्षा अंतर्भूत केली गेली आहे. मात्र गेल्या काही दशकांमध्ये जगभरातील लोकशाही व्यवस्थांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे . ज्यामुळे मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने काही मुलभूत प्रश्न निर्माण झाले आहेत.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Rakh, A. M., & Aawari, R. S. (2026). मानवी हक्क आणि जागतिक लोकशाहीसमोरील आव्हाने – एक अभ्यास. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 587–591.

**प्रस्तावना-**

२१ व्या शतकातील लोकशाही ही शासनाची प्रभावी आणि नैतिकरित्या श्रेयस्कर अशी प्रणाली म्हणून जागतिक मान्यता पावली आहे. लोकशाही आणि मानवी हक्क हे एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. लोकशाहीमध्ये व्यक्तीला केंद्रस्थानी मानले जाते, तर मानवी हक्क त्या व्यक्तीच्या सन्मानाचे रक्षण करतात. दुस-या महायुध्दानंतर १९४८ च्या मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यामूळे यास जागतिक मान्यता मिळाली. आंतरराष्ट्रीय कराराच्या माध्यमातून लोकशाही सरकारच्या संकल्पनेत मानवी हक्कांच्या संरक्षणाची मूलभूत अपेक्षा अंतर्भूत केली गेली आहे. मात्र गेल्या काही दशकांमध्ये जगभरातील लोकशाही व्यवस्थांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे . ज्यामुळे मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने काही मुलभूत प्रश्न निर्माण झाले आहेत.

**उद्दिष्टे -**

१) जागतिक लोकशाहीमध्ये मानवी हक्कांच्या सदयस्थितिचा अभ्यास करणे.

२) लोकशाही संस्थांच्या -हासाची कारणे शोधणे.

3) डिजिटल युग आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांच्यातील संघर्षाचे विश्लेषण करणे.

४) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी उपाययोजना सुचविणे.

**गृहितके - (Hypotheses)**

१) वाढल्या हुकूमशाही प्रवृत्तीमुळे जागतिक स्तरावर लोकशाही मूल्यांचा -हास होत आहे.

२) आर्थिक असमानता आणि बेरोजगारी हे मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे मुख्य कारण आहे.

३) सोशल मीडिया साणि चुकीची माहिती लोकशाही प्रक्रियेत अडथळे निर्माण करत आहेत.

**मानवी हक्कांची संकल्पना-**

प्रत्येक व्यक्ती समाजाची अविभाज्य घटक असून त्यांचे वैयक्तिक हक्क अबाधित रहावेत यासाठी कायद्याची निर्मिती करून जे हक्क स्पष्ट केलेले आहेत त्या कायदेशीर हक्कांना मानती हक्क असे म्हणतात . स्वतः चे स्वातंत्र्य कायम राखून दुसऱ्याचे स्वातंत्र्य जपा हा संदेश देण्यासाठी, संयुक्त राष्ट्र संघाने १० डिसेंबर १९४८ मध्ये मानवाधिकाराची घोषणा करून मानवी जीवनाच्या विविध प्रश्नांचा विचार करणारा मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा मान्य केला. त्यालाच मानवी हक्कांची सनद असे म्हटले जाते. या सनदेत मानवाच्या मूलभूत अधिकारांची स्थापना करणे, ती जतन करणे ही उदिष्टे आहेत. त्यामुळे सर्वांना वर्णभेद न करता सामाजिक, नागरी, आर्थिक , राजकीय, शैक्षणिक, कौटुंबिक तसेच संपत्तीविषयक इ. प्रकारचे अधिकार मान्य करण्यात आलेले आहेत.

**मानवी हक्क व्याख्या -**

- **प्रा. ए .जे लास्की** - हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की, ज्याशिवाय व्यक्तिंना सामान्यतः स्वत:चा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होते.
- **प्रा. बोझांके**- आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होय.
- **टी.एच. ग्रीन** - मानवाच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाह्य परिस्थिती म्हणजे हक्क होय.

मानवी जागृती स्वातंत्र्याची मागणी करते, स्वातंत्र्यासाठी हक्कांची गरज भासते आणि हक्कांच्या रक्षणासाठी राज्य आवश्यक असते.हक्कांची निर्मिती किंवा उद्भव सामाजिक परिस्थितीतूनच होत असतो. स्वाभाविकपणे हक्क सामाजिक गरजेतून उदयास येतात, समाजात सर्वच व्यक्तींना समानतेने हक्कांचा लाभ झालेला असतो. तेव्हा प्रत्येक व्यक्तीने आपल्याबरोबर इतरांनाही हक्क मिळाले आहेत याची जाणीव ठेवणे आवश्यक असते . प्रत्येकाने स्वत:च्या हक्कांचा उपभोग घेताना इतरांच्या हक्कांवर आपल्याकडून अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. हक्कांबरोबर कर्तत्वेही उद्यास येतात. हक्क व कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**मानवी हक्क आणि लोकशाहीसमोरील आव्हाने -**

मानवी हक्क आणि जागतिक लोकशाही या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. बदलत्या जागतिक परिस्थितीत या दोन्ही संकल्पनांसमोर मोठी आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञानातील प्रगती जितकी फायदेशीर ठरतेय तितकीच ती या मूल्यांसाठी घातक ठरत आहेत.

**१) लोकशाहीची पीछेहाट -**

अनेक देशांमध्ये लोकशाही पध्दतीने निवडून आलेली सरकारेच हळूहळू हुकुमशाहीकडे झुकताना दिसत आहेत. कायदेमंडळ साणि न्यायपालिकेच्या अधिकारांवर गदा आणून सत्ता एकाच विकाणी केंद्रित केली जात आहे. मुक्त माध्यमांची गळचेपी, पत्रकारांवर दबाव आणणे किंवा माध्यमांना नियंत्रित करणे हे लोकशाहीसमोरील मोठे संकट आहे.

**२) तंत्रज्ञानाचे बदलते स्वरूप -**

डिजिटल युगात मानवी हक्कांचे स्वरूप बदलले आहे. खाजगीपणाचा अधिकार, सरकारे आणि मोठ्या कंपन्या डेटाच्या माध्यमातून लोकांच्या खाजगी आयुष्यावर लक्ष ठेवत आहेत. पेगाससससारखी सॉफ्टवेअर्स अशा तंत्रज्ञानाचा वापर करून मानवी हक्क कार्यकर्त्यांचे आणि विरोधकांचे आवाज दाबले जात आहे.

**३)चुकीची माहिती आणी द्वेषमूलक भाषण-**

सोशल मीडियाचा वापर लोकशाहीला बळकट करण्याऐवजी समाजात फूट पाडण्यासाठी केला जात आहे. निवडणुकीच्या काळात चुकीची माहिती पसरवून जनमत प्रभावित केले जाते . जात,धर्म किंवा लिंगाच्या आधारावर द्वेष पसरवून अल्पसंख्याकांच्या मानवी हक्कांचे उल्लघंन केले जात आहे.

**४)आर्थिक विषमता - (Economic Inequality )**

लोकशाही तेव्हाच यशस्वी होते. जेव्हा सर्वांना समान संधी मिळते. मात्र जगात श्रीमंत आणि गरीब यांच्यांतील दरी रुंदावत आहे. मूठभर लोकांच्या हातात संपत्ती केंद्रित झाल्यामुळे धोरण निर्मितीवर त्यांचा प्रभाव वाढतो, ज्यामुळे सर्वसामान्यांचे हक्क डावलले जातात.

**५) हवामान बदल आणि निर्वासितांचे प्रश्न -**

हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्तीचे प्रमाण वाढले आाहे. ज्यामुळे हवामान निर्वासित ही नवी समस्या निर्माण झाली आहे. युध्द आणि नैसर्गिक आपत्तींमुळे विस्थापित झालेल्या लोकांना मानवीहक्क मिळवून देणे हे जागतिक समुदायासमोर मोठे आव्हान आहे.

**उपाययोजना -**

मानवी हक्क आणि लोकशाही टिकवण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत तर जागतिक स्तरावर नागरी जागृती आणि संस्थात्मक स्वायत्तता राखणे अत्यंत आवश्यक आहे . लोकशाही आणि मानवी हक्कांसमोरील आव्हाने जितकी गंभीर आहेत, तितकेच त्यांचे उपाय हे धोरणात्मक आणि सामाजिक स्तरावर राबवणे गरजेचे आहे . या समस्यांवर मात करण्यासाठी खालील उपाययोजना प्रभावी ठरू शकतात .

**१) संस्थात्मक स्वायत्तता आणि मजबूतीकरण-**

लोकशाहीचे खांब न्यायपालिका, निवडणूक आयोग आणि माध्यमे स्वतंत्र असणे अनिवार्य आहे .न्यायपालिकेचे स्वातंत्र्य- सरकारचा हस्तक्षेप रोखण्यासाठी न्यायव्यवस्थेला पूर्ण स्वायत्तता आणि पुरेसा निधी मिळायला हवा. निवडणूक सुधारणा-पारदर्शक निवडणूक प्रक्रिया आणि राजकीय पक्षांच्या निधीमध्ये पारदर्शकता आणणे गरजेचे आहे .

**२) डिजिटल साक्षरता आणि तंत्रज्ञान नियंत्रण -**

तंत्रज्ञानाचा गैरवापर रोखण्यासाठी कायदेशीर आणि तांत्रिक उपाय हवेत.

डेटा संरक्षण कायदे - प्रत्येक देशाने डेटा सुरक्षा आणि खाजगीपणा यावर कड़क कायदे बनवले पाहिजेत.फेक न्युजवर नियंत्रण – सोशलमीडिया प्लॅटफॉर्म्सनी अल्गोरिदम मध्ये बदल करून द्वेषमुलक भाषण आणि चुकीच्या माहितीवर आपोआप नियंत्रण मिळवण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर केला पाहिजे .

**३) सर्वसमावेशक आर्थिक धोरणे -**

आर्थिक विषमता कमी केल्याशिवाय मानवी हक्कांचे संरक्षण होऊ शकत नाही. समान संधी,शिक्षण आणि आरोग्य सुविधा सर्वांसाठी मोफत किंवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध.करून देणे. प्रगत कर प्रणाली,श्रीमंतांवर योग्य कर लावून त्या पैशांचा विनियोग सामाजिक सुरक्षा योजनांसाठी करणे .

**४) नागरी समाजाचा (Civil Society) सक्रिय सहभाग -**

केवळ सरकारवर अवलंबून न राहता सामान्य नागरिकांनी जागरूक असणे आवश्यक आहे. मानवी हक्क शिक्षण-

शालेय स्तरापासूनच मानवी हक्क आणि लोकशाही मूल्यांचे शिक्षण दिले जावे. मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या संस्थांना संरक्षण आणि प्रोत्साहन मिळायला हवे.

**५) आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि दबावगट -**

मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या देशावर जागतिक स्तरावर दबाव आणणे आवश्यक आहे. युनोसारख्या जागतिक संस्थांनी केवळ निषेध न नोंदवता, प्रत्यक्ष कृती किंवा आर्थिक निर्बंधाद्वारे मानवी हक्कांची अमलबजावणी करावी. विकसित देशांनी विकसनशील देशांना हवामान बदलांशी लढण्यासाठी आर्थिक मदत आणि तंत्रज्ञान पुरवले पाहिजे जेणेकरून विस्थापन कमी होईल.

**निष्कर्ष -**

लोकशाही वाचवणे ही केवळ नेत्यांची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे.जेव्हा लोक प्रश्न विचारतात, तेव्हाच लोकशाही जिवंत राहते.

**संदर्भसूची -**

१) डॉ. श्रीनिवास जोशी ( २०१३) मानवी हक्क - प्रशांत पब्लिकेशन जळगाव .

२) प्रा.व्ही.बी.पाटील ( २००९ ) मानवी हक्क - के सागर पब्लिकेशन्स पुणे.

३) बी.डी.तोडकर (२०१० ) भारत आणि जग -डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

४) पाष्ठे दत्तात्रय (२००७) सामाजिक ज्ञानकोश -डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

५ ) डॉ . सुनिलमाई(२०१०) सामाजिक संशोधन पद्धती - डायमंड पब्लिकेशन्स पुणे.